# म्हणजे काय?

- अमृता प्रधान

निर्माणचा प्रवास सुरू झाला तो 'काहीतरी करायचय' एवढच डोक्यात घेउन. समाजातल्या समस्यांवर काम करायचय वगैरे असले मोठे शब्द निदान माझ्यातरी डोक्यात नव्हते.

पर्यावरण हा माझा जिव्हाळ्याचा विषय. आज विकासाच्या नावाखाली निसर्गाची जी काही ओरबाड चालू आहे त्याची मनापासून चीड येते. त्यासाठी काहीतरी करायचं असं डोक्यात होतं.

निर्माणमधे गेल्यावर पहिल्यांदाच एका मोठ्या प्रश्नाला सामोरं जायला लागलं. पर्यावरणासाठी काहीतरी करायचंय. 'म्हणजे काय?'

निर्माणच्या 4 शिबिरांमधून आणि फेलोशिपमधून याचं उत्तर मिळवण्याच्या दिशेनी प्रवास सुरू झाला.

पहिल्या शिबिरानंतर वाटलं की यातून आपल्या आयुष्याला दिशा मिळू शकते. पण त्यासाठी नुसतं फावल्या वेळात निर्माणचं काम करण्यात अर्थ नव्हता. शिवाय शिक्षण संपवून मी एका पर्यावरणाच्या क्षेत्रात कन्सल्टन्सी करणाऱ्या कंपनीत काम तर करत होते. पण तिथे पर्यावरणाचा नुसता मुखवटा होता. 'पैसे' हाच खरा उद्देश.

म्हणून निर्माणची फेलोशिप घ्यायचं ठरलं. यात तुम्ही तुम्हाला भिडलेल्या कुठल्यातरी एका प्रश्नावर तो सोडवण्याच्या दृष्टीने काम करायचं असतं.

माझी होस्ट ऑरगनायझेशन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) आहे. शिक्षण हा MKCL च्या जिव्हाळ्याचा विषय तर पर्यावरण हा माझ्या. म्हणून या दोघांच एकत्रीकरण करत शाळेतल्या विद्यार्थ्यांमधे पर्यावरणाबाबत जागृतीवर काम करायचं असं ठरलं.

मुलांपर्यंत पोहोचायचं तर त्यांच्याच विश्वातली, त्यांच्या ओळखीची अशी एखादी गोष्ट माध्यम म्हणून निवडायची होती. विवेक सावंत, MKCL चे मॅनेजिंग डिरेक्टर आणि माझे मेंटर, यांनी 'शाळांमधला वाढता कागदाचा वापर' हा विषय सुचवला. कुठलाही प्रश्न सोडवायचा असेल तर आधी तो मोजावा लागतो. म्हणून शाळेतले विद्यार्थी किती कागद वापरतात ते मोजून बघितलं. त्यासाठी 8 वी, 9वी आणि 10वी च्या पुण्यातल्या 2 आणि पुण्याच्या बाहेरच्या खेड्यातल्या 3 अशा एकूण 5 शाळांमधल्या 135 मुलांचा सर्व्हे केला. त्यात असं दिसलं की 8 वी, 9वी आणि 10वी च्या विद्यार्थ्यांमधला सरासरी कागदाचा वापर 10 किलो आहे.

'शाळांमधला कागदाचा वापर मोजणे आणि तो कमी करण्यासाठी उपाय सुचवणे' असा या सर्व्हेचा उद्देश मी ठरवला होता. पण सर्व्हे केल्यावर लक्षात आलं की तो कमी करायचा असेल तर शिक्षणाच्या पद्धतीमधे बदल आवश्यक आहे. तो काही माझा विषय नाही. शिवाय या सर्व्हेवर असा आक्षेप काहींनी घेतला की इतर अनेक क्षेत्रात कागदाचा गैरवापर मोठ्या प्रमाणात होत असताना शाळेतल्या मुलांना वापर कमी करा म्हणून का वेठीला धरायचं? इथे मात्र मी अडले. असं वाटलं, अरे खरच, आपण काहीतरी चुकीच्या दिशेनी चाललोय.

पण विवेक काकांशी आणि बाकी फेलोजशी बोलून कळलं की कुठलाही प्रश्न खूप मोठा असतो. त्याचं एक टोक आपल्याला धरायला लागतं. शाळेतल्या मुलांना कागदाच्या वापरासाठी गुन्हेगार ठरवणं हे आपलं उद्दिष्ट नाहीच. तर कागदाच्या माध्यमातून पर्यावरणाचा विषय त्यांच्या मनात रुजवणं हे आपलं उद्दिष्ट आहे.

म्हणजे कागदाचा आणि पर्यावरणाचा कसा संबंध आहे हे त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवं. कागद तयार करताना प्रमुख कच्चा माल म्हणजे लाकूड, किंवा तत्सम पदार्थ, म्हणजे मळी किंवा बांबू आणि पाणी. याशिवाय उत्पादनासाठी लागणारी ऊर्जा. भारतात 35% कागद लाकडापसून बनवतात. एक टन कागद तयार करण्यासाठी भारतात सरासरी 2.2 ते 2.4 टन लाकूड, 120 ते 200 घनमीटर पाणि आणि 23 ते 37 गिगाज्यूल एवढी ऊर्जा लागते असं Central Pulp and Paper Research Institute सांगते. हे लाकूड एकतर वनांमधून आणलेलं असतं किंवा विक्रीसाठी विशिष्ट प्रकारच्या झाडांच्या लागवडीतून आणलेलं असतं. अशा लागवडी वनक्षेत्राच्या जमिनींवर किंवा खाजगी जमिनींवर केल्या जातात. लाकूड खरेदी करताना जी किंमत दिली जाते ती वनांच्या खऱ्या पर्यावरणीय मुल्यापेक्षा कितीतरी कमी असते. पाणी ज्या नदीमधून उपसलं जातं तिथल्या पर्यावरण परिसंस्थांवर जो ताण येतो त्याची किंमत पाण्यासाठी दिल्या जाणाऱ्या करापेक्षा कितितरी जास्त असते. तसंच उत्पादन करताना जे जलप्रदूषण, वायूप्रदूषण होतं त्याची किंमत ना उत्पादक कंपनी चुकवते, ना कागदाचा वापरकर्ता. ती चुकवतात त्या कारखान्याच्या आजुबाजूला असणाऱ्या गावांमधले लोक, तिथली अशुद्ध होणारी हवा, नद्या आणि त्यातले जलचर.

या सगळ्या किंमती रुपयांमधे मोजण्यासाठी तद्यांनी काही पद्धती विकसित केल्या आहेत. एखाद्या कागद कारखान्यासाठी त्यांनी वापरालेल्या संसाधनांची पर्यावरणीय किंमत आणि उत्पादनातून झालेल्या प्रदूषणाची पर्यावरणीय किंमत याला आपण एकत्रितपणे कागदाची पर्यावरणीय किंमत किंवा Environmental Cost म्हणू शकतो.

सध्या कागदासाठीची पर्यावरणीय किंमत काढणे, यावर काम चालू आहे. त्याची पुढची पायरी म्हणजे ही माहिती शाळेतल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.

पर्यावरणाच्या प्रश्नाच्या निमित्तानी झालेला हा निर्माण फेलोशिपमधला प्रवास. एखादा प्रश्न सोडवायचा म्हणजे नक्की काय? तो प्रश्न निर्माण होण्यामागे कारणांच मोठ्ठ जाळं असतं. तो सोडवायचा असेल तर पहिली पायरी म्हणून आपल्या क्षमता, कौशल्य आणि स्वभाव यानुसार कृती ठरवावी लागते. आपले छोटे प्रयत्न हे कुठल्या मोठ्या बदलाच्या दिशेनी आहेत हे सतत ध्यानात ठेवावं लागतं. ही निर्माणनी दिलेली सगळ्यात मोठी समज. हे समजायला अर्थातच पडायला लागलं, धडपडायला लागलं.
नुसतच आंधळेपणानी विरोध करून प्रश्न सुटत नसतो. तो सोडवायचा असेल तर त्याचा सगळ्या अंगांनी विचार होण्याची गरज असते. त्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगवेगळ्या क्षमता, कौशल्यांची गरज असते. एकाच व्यक्तीत ती सगळी सापडणं कठीण. म्हणूनच अनेक लोकांनी अनेक अंगांनी काम करायला लागतं. जे ज्याचं कौशल्य तो ते काम उचलणार. गट कृतीचा हा अर्थ निर्माणमधे आल्यावर कळला.
पर्यावरणाचं काम करायचय तर लोकांबरोबर कशाला? आपण आपलं करू ना. असा माझा प्रामाणिक गैरसमज होता. तो निर्माणच्या प्रक्रियेत येउन दूर झाला. शेवटी कुठलाही बदल घडवायचा तर तो एकत्रितपणेच घडतो. म्हणून लोक तर हवेतच. मला खूप लोकांबरोबर काम करण्याची सवय नाही. तो माझा स्वभाव नाही. माझं मित्रमंडळ पण आत्तापर्यंत छोटच असत आलेलं आहे. पण या मर्यादेवर कुठेतरी मात करायला हवी, ते आवश्यक आहे, हे आता जाणवतय.
स्वतःचे स्वतः प्रयोग करत, धडपडत शिकणं ही प्रक्रिया खूपच आनंददायी आहे. पण सारखं Self Motivated राहणं कधी कधी अवघड जातं. अशा वेळी आपल्यासारखेच इतर अनेक जण आजुबाजुला बघून उत्साह पण येतो आणि सुरक्षित पण वाटतं.
एका दिव्यानी वाटेवरचा काही भाग उजळतो. पण संपूर्ण अंधारी वाट उजळायची असेल तर असे अनेक दिवे टप्प्याटप्प्यावर लावावे लागतात. आज निर्माणमधे असे अनेक दिवे वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले आहेत. कोणी पाणी प्रश्नावर काम करतोय, कोणी आरोग्याच्या तर कोणी रोजगाराच्या. उद्या याच दिव्यातून अजुन असंख्य दिवे लागतील आणि अनेक अंधाऱ्या वाटा उजळून निघतील.



amrutapradhan@gmail.com